RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ३, अंक ४७] शनिवार, एप्रिल २९, २०१७/वैशाख ९, शके १९३९ [पृष्ठे २७, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १०९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ एप्रिल २०१७

## अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण-२०१६/(३४७/१६)/विशि-३.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम २७ हे, राज्य शासनास, कुलपतींशी विचारविनिमय करून, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्याच्या नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करून घेण्याच्या पात्रता शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार प्रदान करते,—

त्याअर्थी, आता, उक्त कलम २७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन विनिर्दिष्ट करते की,—

१. यासोबत जोडलेल्या अनुसूची एकच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठीच्या पात्रता शर्ती या, त्या अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये उक्त प्राधिकरणासमोर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

२. यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करून घेण्याच्या पात्रता शर्ती या, त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्यापुढे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

## अनुसूची एक

| अ.क्र<br><br>(१) | प्राधिकरण व कलम<br><br>(२) | प्राधिकरणाचा सदस्य म्हणून<br>निवडून येण्यासाठीच्या पात्रता शर्ती<br>(३) |
|---|---|---|
| | अधिसभा (कलम २८) | |
| (एक) | कलम २८ (२) (ण) प्राचार्य | प्राचार्यांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले-<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ख) राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिति, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती प्रमाणपत्र असलेल्या आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल अशा महाविद्यालयाचा प्राचार्य असावा,<br>(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (दोन) | कलम २८ (२)(त)<br>व्यवस्थापनाचे प्रतिनिधी | संलग्न महाविद्यालय अथवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटाने त्यांच्या मधून निवडून दिलेले -<br>(क) स्नातक पदवी धारण केलेला असावा,<br>(ख) व्यवस्थानाच्या नियामक मंडळाचा/व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असावा,<br>(ग) राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिति राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे. |
| (तीन) | कलम २८ (२) (द)<br>अध्यापक (प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्याखेरीज इतर) | अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले -<br>(क) पीएच. डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा,<br>किंवा<br>एकूण किमान पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (चार) | कलम २८ (२) (ध)<br>विद्यापीठ अध्यापक | विद्यापीठ अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले -<br>(क) पीएच. डी पदवी धारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |

| | | |
|---|---|---|
| (पाच) | कलम २८ (२) (न) नोंदणीकृत पदवीधर | नोंदणीकृत पदवीधर गटाने निवडून दिलेले - (क) नामनिर्देशनाच्या दिनांकापूर्वी किमान पाच वर्षे आधी पदवीधर झालेला असावा. यामध्ये अध्यापक ( नियमित किंवा कंत्राटी तत्त्वावरील अध्यापकांचा-मग त्यांचा अध्यापकीय अनुभव काहीही असो), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन किंवा कलम २८ (२) मध्ये अंतर्भूत असणाऱ्या इतर कोणत्याही प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या पदवीधरांचा समावेश होणार नाही. |
| **२. व्यवस्थापन परिषद (कलम ३०)** | | |
| (एक) | कलम (३०) (४) (च) प्राचार्य | अधिसभेचे सदस्य असतील अशा प्राचार्यांमधून अधिसभेने निवडून दिलेले- (क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा, (ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (दोन) | कलम (३०) (४) (छ) अध्यापक (मान्यता प्राप्त संस्थेचे प्राचार्य किंवा संचालक नाहीत असे) | अधिसभेचे सदस्य असतील अशा, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक (जे प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संचालक नाहीत) यांमधून अधिसभेने निवडून दिलेले - (क) पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा, किंवा एकूण किमान पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा, (ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (तीन) | कलम ३० (४) (ज) व्यवस्थापन प्रतिनिधी | अधिसभेचे सदस्य असतील अशा व्यवस्थापन प्रतिनिधींमधून अधिसभेने निवडून दिलेले - (क) स्नातक पदवीधारक असावा, (ख) व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा/व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असावा, (ग) राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिति राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे, (घ) ज्यांचा विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या लगतपूर्वीच्या व्यवस्थापन परिषदेवर प्रतिनिधी होता अशा व्यवस्थापनाचा प्रतिनिधी नसावा. |
| (चार) | कलम ३० (४) (झ) नोंदणीकृत पदवीधर | अधिसभेच्या निवडून दिलेल्या नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून अधिसभेने निवडून दिलेले- |
| (पाच) | कलम ३० (४) (ञ) विद्यापरिषदेचे निर्वाचित अध्यापक सदस्य | विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडून दिलेले- (क) पीएच.डी पदवीधारक असावा, (ख) एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा, (ग) मान्यताप्राप्त पीएच. डी. मार्गदर्शक असावा ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली असेल, |

| | | |
|---|---|---|
| | | (घ) किमान दोन पाठ्यपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत,<br>(ङ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान ५ वर्षे केलेले असावे. |
| **३. विद्यापरिषद (कलम ३२)** | | |
| एक | कलम ३२ (३)(छ) अध्यापक (प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारे दोन अध्यापक) | अध्यापक गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले -<br>(क) पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ख) एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) मान्यताप्राप्त पीएच. डी. मार्गदर्शक असेल ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असेल,<br>(घ) किमान दोन पाठ्यपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत,<br>(ङ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| **४. अभ्यास मंडळ (कलम ४०)** | | |
| (एक) | कलम ४० (२)(ग) संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थामधील विभाग प्रमुख | संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थाच्या विभाग प्रमुखांच्या गटामधून निवडून दिलेले -<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच. डी. पदवीधारक असावा,<br>(ख) पदवीपूर्वस्तरावर एकूण किमान दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (दोन) | कलम-४०(२) (घ) (एक) प्रत्येक अभ्यास मंडळाचा अध्यक्ष | संबंधित अभ्यास मंडळाच्या सदस्यांमधून निवडलेला -<br>(क) पीएच. डी. पदवीधारक असावा,<br>(ख) एकूण किमान पंधरा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करणारा मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असावा,<br>(घ) मान्यताप्राप्त पीएच. डी. मार्गदर्शक असावा ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली असेल,<br>(ङ) किमान दोन पाठ्यपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक / अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्स मध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावे,<br>(च) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |

## अनुसूची-दोन

| अ.क्र | प्राधिकरण आणि कलम | प्राधिकरणाचा सदस्य म्हणून<br>नामनिर्देशित करण्याच्या किंवा स्वीकृत करून घेण्याच्या पात्रता शर्ती |
|---|---|---|
| १. | **अधिसभा (कलम २८)** | |
| (एक) | कलम २८ (२) (प)<br>व्यक्ती | संलग्न महाविद्यालय /मान्यताप्राप्त परिसंस्था/ विद्यापीठ यांच्याशी संबंधित नसतील अशी, कुलपतीने नामनिर्देशित केलेली -<br>(क) कृषि, समाजकार्य, सहकारी चळवळ, विधिविषयक, वित्तीय, बँक व्यवसाय व सांस्कृतिक कार्य क्षेत्रातील चार व्यक्ती,<br>(ख) उद्योग क्षेत्रातील एक व्यक्ती,<br>(ग) एक शिक्षणतज्ज्ञ,<br>(घ) एक शास्त्रज्ञ,<br>(ङ) प्रयोगनिष्ठ व ललित कला किंवा वाड़मय किंवा क्रीडा क्षेत्रातील एक व्यक्ती,<br>(च) पर्यावरण अथवा निसर्ग संरक्षण संबंधित कामामध्ये कार्यरत असलेल्या संघटनेतील एक व्यक्ती,<br>(छ) महिला विकास अथवा ज्येष्ठ नागरिक कल्याण अथवा संदेशवहन व प्रसारमाध्यमे या क्षेत्रात कार्यरत असलेल्या संघटनेतील एक व्यक्ती. |
| (दोन) | कलम २८ (२) (फ)<br>अध्यापकेतर कर्मचारी | कुलगुरूने नामनिर्देशित केलेले-<br>(क) विद्यापीठाच्या वर्ग-३/वर्ग-४ मधील कायम अध्यापकेतर कर्मचाऱ्यां-पैकी एक,<br>(ख) संलग्न महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यामधील कायम अध्यापकेतर कर्मचाऱ्यांपैकी एक,<br>(ग) एकूण किमान १० वर्षांचा अनुभव असलेला पूर्ण वेळ कर्मचारी असावा,<br>(घ) मागील सलग पाच वर्षे सातत्याने चांगला गोपनीय अहवाल असलेला असावा. |
| (तीन) | कलम २८(२) (ब)<br>विधानसभेचे सदस्य | राज्य विधानसभेच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेले -<br>पदवीधर असावा. |
| (चार) | कलम २८(२) (भ)<br>विधानपरिषदेचा सदस्य | राज्य विधानपरिषदेच्या सभापतीने नामनिर्देशित केलेले -<br>पदवीधर असावा. |
| (पाच) | कलम २८(२) (म)<br>नगरपालिका किंवा महानगरपालिका यांचा सदस्य | कुलगुरूने नामनिर्देशित केलेले -<br>पदवीधर असावा. |
| (सहा) | कलम २८(२) (य)<br>जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीचा प्रतिनिधी | शिक्षण समितीने आळीपाळीने नामनिर्देशित केलेला<br>पदवीधर असावा. |

| | | |
|---|---|---|
| **२. व्यवस्थापन परिषद (कलम ३०)** | | |
| (एक) | कलम ३० (४) (ग)<br>विख्यात व्यक्ती | कुलपतीने नामनिर्देशित केलेले-<br>शिक्षण, उद्योग,कृषी,वाणिज्य, बँकव्यवसाय, वित्त, सामाजिक , सांस्कृतिक व इतर संलग्न क्षेत्रे यांतील असावा. |
| (दोन) | कलम ३० (४) (ङ)<br>विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्थेचा प्रमुख किंवा संचालक | कुलगुरूने नामनिर्देशित केलेले-<br>(क) विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्था यांचे प्रमुख किंवा संचालक यांच्यामधून आळीपाळीने एक वर्षाच्या मुदतीकरिता नामनिर्देशित केलेला असावा,<br>(ख) पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ग) एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(घ) मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असावा, ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल,<br>(ङ) किमान दोन पाठ्यपुस्तकांचा / संदर्भ पुस्तकांचा लेखक / सहलेखक असावा किंवा मूळ लेखक / अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत,<br>(च) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (तीन) | कलम ३० (४) (ट)<br>ख्यातनाम तज्ज्ञ | कुलगुरूने कुलपतीशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेले-<br>राष्ट्रीय कीर्तीच्या परिसंस्थेमधून किंवा संघटनेमधून नामनिर्देशित केलेला ख्यातनाम तज्ज्ञ असावा. |
| **३. विद्यापरिषद (कलम ३२)** | | |
| (एक) | कलम ३२ (३)(च)(एक)<br>प्राचार्य | कुलगुरूने कुलपतीशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेले-<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ख) राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिति राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती प्रमाणपत्र असलेल्या आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झालेला नसेल अशा महाविद्यालयाचा प्राचार्य असावा,<br>(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (दोन) | कलम ३२ (३) (च)<br>(दोन)<br>प्राध्यापक | कुलगुरूने कुलपतीशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेले-<br>(क) यांपैकी एक विद्यापीठ विभागामधून असावा व एक संचालित, स्वायत्त अथवा संलग्न महाविद्यालयामधून असावा,<br>(ख) पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ग) एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(घ) मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असावा, ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल, |

| | | |
|---|---|---|
| | | (ङ) किमान दोन पाठ्यपुस्तकांचा / संदर्भ पुस्तकांचा लेखक / सहलेखक असावा किंवा मूळ लेखक / अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत,<br>(च) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (तीन) | कलम ३२(३)(च)(तीन) मान्यताप्राप्त परिसंस्थेचा प्रमुख | कुलगुरूने कुलपतीशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेले-<br>(क) पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ख) एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असावा, ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल,<br>(घ) किमान दोन पाठ्यपुस्तकांचा / संदर्भ पुस्तकांचा लेखक / सहलेखक असावा किंवा मूळ लेखक / अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत,<br>(ङ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (चार) | कलम ३२ (३)(ज) व्यवस्थापनाचे प्रतिनिधी | अधिसभेने अधिसभेचे सदस्य असलेल्या व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींमधून नामनिर्देशित केलेले-<br>(घ) स्नातक पदवी धारण केलेला असावा,<br>(ङ) व्यवस्थानाच्या नियामक मंडळाचा/व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असावा,<br>(च) राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिति राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे. |
| **४. विद्याशाखा (कलम ३४)** | | |
| (एक) | कलम ३४(४)(घ) विद्याशाखेचे सदस्य म्हणून मान्यताप्राप्त अध्यापक - **प्रत्येक अभ्यासमंडळामधून एक** | प्रत्येक अभ्यासमंडळाने नामनिर्देशित केलेले-<br>(क) एक मान्यताप्राप्त अध्यापक असावा,<br>(ख) प्राचार्य म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच. डी. पदवीधारक असावा,<br>(ग) एकूण किमान दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(घ) जो किमान दोन पाठ्यपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक / सहलेखक असावा किंवा मूळ लेखक / अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत,<br>(ङ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (दोन) | कलम ३४(४)(ड.) - ख्यातनाम उच्च विद्याविभूषित (निमंत्रित व्यक्ती म्हणून) | विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून प्र-कुलगुरूने नामनिर्देशित केलेले-<br>विद्याशाखेतील विषयांमध्ये उच्च विद्याविभूषित आणि औद्योगिक किंवा व्यावसायिक कामगिरीसाठी ख्यातनाम असावा. |

| ५. अभ्यासमंडळ (कलम ४०) | | |
|---|---|---|
| (एक) | कलम ४०(२)(ख)(एक) विद्यापीठ अध्यापक | कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेला -<br>(क) संबंधित विषयातील एकूण किमान १० वर्षांच्या अध्यापनाच्या अनुभवासह पीएच. डी. पदवीधारक असावा,<br>(ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (दोन) | कलम ४०(२)(ख)(दोन) संलग्न महाविद्यालयाचे पदव्युत्तर अध्यापक | कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेले -<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच. डी. पदवीधारक असावा,<br>(ख) एकूण किमान दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अथवा पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असावा,<br>(घ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (तीन) | कलम ४०(२)(ख)(तीन) संलग्न महाविद्यालयांतील अध्यापक ( विभागप्रमुख नसलेले) | कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेले —<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ख) पदवीपूर्व स्तरावरील किमान १० वर्षांचा पदवीपूर्व अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (चार) | कलम ४०(२)(घ)(एक) इतर विद्यापीठांमधील प्राध्यापक | अभ्यासमंडळाने त्याच्या पहिल्या बैठकीमध्ये स्वीकृत केलेले —<br>(क) इतर सांविधिक सार्वजनिक विद्यापीठातील मान्यताप्राप्त प्राध्यापक असावा,<br>(ख) एकूण किमान १० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा, |
| (पाच) | कलम ४०(२)(घ)(दोन) तज्ज्ञ - चार<br>(क) राष्ट्रीय प्रयोगशाळा/ परिसंस्था/ उद्योग यातील तज्ज्ञ | अभ्यासमंडळाने त्याच्या पहिल्या बैठकीमध्ये स्वीकृत केलेले —<br>(क) राष्ट्रीय प्रयोगशाळा किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा उद्योग यांमधील सहायक संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण करणारा व्यक्ती असावा,<br>किंवा<br>संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ असावा,<br>(ख) त्या विषयातील किमान एक संदर्भ पुस्तक प्रसिद्ध केलेले असावे,<br>किंवा<br>तज्ज्ञ परीक्षित राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत, |

| | | |
|---|---|---|
| | (ख) नामवंत उच्च विद्याविभूषित | (क) त्या विषयातील नामवंत विद्याव्यासंगी असावा,<br>(ख) त्या विषयातील किमान एक संदर्भ पुस्तक प्रसिद्ध केलेले असावा,<br>किंवा<br>तज्ज्ञ परिक्षित राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत, |
| | (ग) उद्योग किंवा व्यावसायिक संस्था यामधील नामवंत व्यक्ती | विषयाशी संबंधित उद्योगामधील नामवंत व्यक्ती असावी,<br>किंवा<br>विषयाशी संबंधित संघटनेमधील नामवंत व्यक्ती असावी,<br>किंवा<br>विषयाशी संबंधित व्यावसायिक संस्थेमधील नामवंत व्यक्ती असावी, |
| | (घ) अनुभवी व्यक्ती | विषयाशी संबंधित उद्योगामध्ये किमान १० वर्षे कामाचा किंवा मार्गदर्शक किंवा सल्लागार किंवा मालक म्हणून किमान १० वर्षांचा अनुभव असणारी व्यक्ती असावी. |
| **६ . विद्यापीठ विभाग आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासमंडळ (कलम ४२)** | | |
| (एक) | कलम ४२(२)(ग) तज्ज्ञ ( विज्ञान व तंत्रज्ञान, मानव्यविज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, आंतरविद्याशाखीय अभ्यास अशा विद्याशाखेतील प्रत्येकी एक) | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले ---<br>(क) संशोधन व विकास प्रयोगशाळा यामधील प्राध्यापक किंवा समतुल्य पद धारण करणारा असावा,<br>(ख) संशोधन व विकास प्रयोगशाळांमध्ये प्राध्यापक किंवा समतुल्य पदावरील किमान पाच वर्षांचा अनुभव असावा. |
| (दोन) | कलम ४२(२)(घ) विभागप्रमुख / वरिष्ठ प्राध्यापक | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले---<br>(क) विद्यापीठ विभाग प्रमुख किंवा विद्यापीठ विभागामधील वरिष्ठ प्राध्यापक असावा,<br>(ख) अध्यापन व संशोधन यामधील किमान १५ वर्षांचा अनुभव असावा,<br>(ग) मान्यताप्राप्त, पीएच.डी. मार्गदर्शक असावा, ज्याच्या मार्गदर्शनाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल,<br>(घ) जो किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत, |
| **७. महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळ (कलम-४४)** | | |
| (एक) | कलम ४४(३)(ग) इतर विद्यापीठांमधील विद्याशाखानिहाय तज्ज्ञ - (प्रत्येकी एक) | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले---<br>(क) प्राध्यापक असावा,<br>(ख) प्राध्यापक म्हणून किमान ५ वर्षांचा अनुभव असावा, |

| | | |
|---|---|---|
| (दोन) | कलम ४४(३)(घ) महाविद्यालयातील विद्याशाखानिहाय विभागप्रमुख | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले-<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ख) एकूण किमान १५ वर्षांचा पदवीपूर्व अध्यापनाचा अनुभव असावा त्यापैकी किमान पाच वर्षांचा अनुभव,जेथे संबंधित विषयातील प्रत्यक्ष पदव्युत्तर पाठयक्रम शिकविला जातो अशा महाविद्यालयातील पदव्युत्तर केंद्रातील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक म्हणून असावा,<br>(ग) किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत,<br>(घ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| **८. आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ (कलम ४५)** | | |
| (एक) | कलम ४५(३)(घ) विख्यात तज्ज्ञ | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले---<br>(क) आजीवन अध्ययन कौशल्य, मूल्य शिक्षण याच्या कार्यक्षेत्रात आणि सखोल शिक्षण क्षेत्रात कार्य करणारा असावा,<br>(ख) अशा कार्यात सक्रियपणे कार्यरत असल्याचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा. |
| (दोन) | कलम ४५(३)(ङ) विद्यापीठ विभागातील अध्यापक | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले ---<br>(क) पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ख) नवोपक्रम, संशोधन व विकास या क्षेत्रातील किमान ५ वर्षांचा अनुभव असावा. |
| (तीन) | कलम ४५(३)(च) महाविद्यालयामधील अध्यापक- दोन | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले ---<br>(क) पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ख) नवोपक्रम, संशोधन व विकास आणि विस्तार क्षेत्रातील किमान पाच वर्षांचा अनुभव असावा. |
| **९. परीक्षा व मूल्यमापन मंडळ (कलम ४७)** | | |
| (एक) | कलम ४७(३)(घ) अधिष्ठात्यांव्यतिरिक्त प्राचार्य | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले ---<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ख) एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाच्या अनुभव असावा,<br>(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण पाच वर्षे केलेले असावे. |

| | | |
|---|---|---|
| (दोन) | कलम ४७(३)(ङ) विद्यापीठ विभागामधील प्राध्यापक | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले---<br>(क) विद्यापीठ विभागातील/ परिसंस्थेतील प्राध्यापक असावा,<br>(ख) पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ग) एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(घ) मान्यताप्राप्त, पीएच.डी. मार्गदर्शक असावा, ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल,<br>(ङ) किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत,<br>(च) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (तीन) | कलम ४७(३) (च) विभाग प्रमुख किंवा प्राचार्य यांच्याखेरीज संलग्न महाविद्यालयातील एक अध्यापक | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले ---<br>(क) विभाग प्रमुख किंवा प्राचार्याखेरीज अध्यापक असावा,<br>(ख) पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ग) किमान १५वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा त्यापैकी किमान ५ वर्षांचा पदव्युत्तर स्तरावर अनुभव असावा,<br>(घ) मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असावा,<br>(ङ) किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत,<br>(च) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (चार) | कलम ४७(३) (छ) तज्ज्ञ | कुलगुरूने नामनिर्देशित केलेले ---<br>(क) पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ख) एकूण किमान दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे,<br>(घ) संगणकीकृत मूल्यमापनाच्या क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञ असावा. |
| (पाच) | कलम४७(३) (ज) निमंत्रित म्हणून तज्ज्ञ | कुलगुरूने नामनिर्देशित केलेले---<br>(क) महाराष्ट्र राज्यातील इतर सांविधिक विद्यापीठातील उपकुलसचिवाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेली व्यक्ती,<br>(ख) संगणकीकृत परीक्षेच्या कामासंबंधीचा अनुभव असावा. |
| **१० माहिती तंत्रज्ञान मंडळ (कलम४९)** | | |
| (एक) | कलम ४९(३) (च) प्राध्यापक | कुलगुरूने नामनिर्देशित केलेले---<br>(क) विद्यापीठ विभागातील असावा,<br>(ख) पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ग) एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा, |

| | | |
|---|---|---|
| | | (घ) कार्यप्रणाली (सॉफ्टवेअर) व हार्डवेअरच्या क्षेत्रातील ज्ञान असलेला नामांकित तज्ज्ञ असावा. |
| (दोन) | कलम ४९ (३) (छ) तज्ज्ञ | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले---<br>(क) माहिती व संदेशवहन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील तज्ज्ञ असावा,<br>(ख) त्यांपैकी प्रत्येकी एक कार्यप्रणाली (सॉफ्टवेअर) व दुसरा हार्डवेअर या क्षेत्रातील तज्ज्ञ असावा. |
| **११. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ ( कलम ५१ )** | | |
| (एक) | कलम ५१(३) (घ) व्यवस्थापन परिषदेचा सदस्य | कुलगुरूने नामनिर्देशित केलेले---<br>व्यवस्थापन परिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यापैकी एक सदस्य असावा. |
| (दोन) | कलम ५१ (३) (ङ) विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील वरिष्ठ प्राध्यापक | कुलगुरूने नामनिर्देशित केलेले---<br>(क) विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील असावा,<br>(ख) पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ग) एकूण किमान पंधरा वर्षांचा अध्यापनाचा/संशोधनाचा अनुभव असावा,<br>(घ) मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असावा, ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल,<br>(ङ) किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत,<br>(च) सहयोग किंवा साहचर्य क्षेत्रातील अनुभव असावा. |
| (तीन) | कलम ५१(३) (च) प्राचार्य | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले---<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ख) एकूण किमान पंधरा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) सहयोग किंवा साहचर्य क्षेत्रामधील अनुभव असावा,<br>(घ) स्वायत्त किंवा अधिकारदत्त महाविद्यालये/परिसंस्थांमधील एक प्राचार्य असावा,<br>(ङ) संलग्न महाविद्यालयामधील एक प्राचार्य असावा. |
| (चार) | कलम ५१(३) (छ) | महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाने (माहेड) नामनिर्देशित केलेले-<br>(क) उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ असावा,<br>(ख) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मधील नामवंत तज्ज्ञ असावा. |
| **१२ नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ (कलम ५३)** | | |
| (एक) | कलम ५३ (३) (घ) उद्योगपती | महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाने ( माहेड ) नामनिर्देशित केलेले---<br>(क) नवोपक्रम , नवसंशोधन व उपक्रम या क्षेत्रातील विख्यात तज्ज्ञ असावा, |

| | | |
|---|---|---|
| | | (ख) उत्पादन , माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान, जैव विज्ञान व तंत्रज्ञान कृषी उद्योग किंवा सेवा उद्योग या क्षेत्रात महत्वाचे पद धारण करणारा असावा. |
| (दोन) | कलम ५३ (३) (ङ) वरिष्ठ व्यवस्थापक | कुलगुरूने नामनिर्देशित केलेले-<br>विद्यापीठाचे मुख्यालय ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्ह्याच्या अग्रणी बँकेमधील वरिष्ठ व्यवस्थापक. |
| (तीन) | कलम ५३ (३)(च) विद्यापीठाचे अध्यापक | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले-<br>(क) विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठाच्या परिसंस्था यामधील असावा,<br>(ख) पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ग) एकूण किमान दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(घ) नवोपक्रम, नवसंशोधन व विकास किंवा बौद्धिक संपदा अधिकार किंवा नव संशोधन केंद्रे / उपक्रम स्थापन करण्यात सक्रियपणे कार्यरत असावा. |
| (चार) | कलम ५३ (३) (छ) महाविद्यालयांमधील अध्यापक | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले-<br>(क) संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांमधील असावा,<br>(ख) पीएच.डी. पदवी धारक असावा,<br>(ग) एकूण किमान १० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(घ) नवोपक्रम , नवसंशोधन व विकास किंवा बौद्धिक संपदा अधिकार किंवा नव संशोधन केंद्रे / उपक्रम स्थापन करण्यात सक्रियपणे कार्यरत असावा. |
| **१३. विद्यार्थी विकास मंडळ (कलम ५५)** | | |
| (एक) | कलम ५५ (२) (ग) व्यावसायिक व्यक्ती (प्रायोगिक कला) | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले-<br>प्रायोगिक कला क्षेत्रातील सक्रीय व्यावसायिक व्यक्ती असावी. |
| (दोन) | कलम ५५ (२) (घ) व्यावसायिक व्यक्ती (कला व ललित कला) | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले-<br>कला व ललित कला या क्षेत्रातील सक्रीय व्यावसायिक व्यक्ती असावी. |
| (तीन) | कलम ५५ (२) (च) अध्यापक | कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेले -<br>(क) त्यापैकी एक महिला असावी,<br>(ख) एकूण किमान पाच वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रम किंवा राष्ट्रीय सेवा योजना किंवा राष्ट्रीय छात्र सेना कार्यक्रमात सक्रीय सहभाग असावा. |
| (चार) | कलम ५५ (२)(ज) जिल्हा समन्वयक | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले-<br>(क) मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून किमान १० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ख) विद्यापीठाने नेमून दिलेल्या सांस्कृतिक विद्यार्थी कल्याण कार्यक्रमाचा जिल्हा समन्वयकाची जबाबदारी धारण केलेला असावा,<br>(ग) विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रम किंवा |

| | | |
|---|---|---|
| | | राष्ट्रीयसेवा योजना किंवा राष्ट्रीय छात्र सेवा कार्यक्रमात सक्रीय सहभाग असलेला असावा. |
| **१४ .क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ (कलम ५०)** | | |
| (एक) | कलम ५७ (२) (ग) व्यावसायिक | कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेले- <br>(क) राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा/ कार्यक्रम/ खेळ यामध्ये सहभाग घेणारी खेळाडू व्यक्ती असावी, <br>(ख) राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धा कार्यक्रम/खेळ यांचा प्रशिक्षण देण्याचा आणि आयोजन करण्याचा खात्रीलायक अनुभव असावा. |
| (दोन) | कलम ५७(२)(ङ) विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील अध्यापक | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले- <br>(क) विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील असावा, <br>(ख) पीएच.डी. पदवी धारक असावा, <br>(ग) एकूण किमान दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा, |
| (तीन) | कलम ५७ (२) (च) क्रीडा अध्यापक | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले- <br>(क) संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयामधील शारीरिक शिक्षण संचालक किंवा क्रीडा अध्यापक असावा, <br>(ख) शारीरिक शिक्षण संचालक म्हणून किमान १० वर्षांचा अनुभव असावा अथवा अध्यापनाचा किमान दहा वर्षांचा अनुभव असावा, <br>(ग) विद्यापीठ/ राज्य/ राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा/कार्यक्रम/ खेळ यात सहभागाचा किंवा त्याचे आयोजन करण्याचा अनुभव असावा. |
| (चार) | कलम ५७ (२) (झ) विद्यार्थी सदस्य | विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले- <br>कलम ९९ च्या पोट कलम (४) च्या उपखंड (ख) च्या उपपोटखंड (५)च्या अन्वये विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या क्रीडा क्षेत्रातील सदस्य असावा. |
| **१५. संशोधन मंडळ (कलम ५९)** | | |
| (एक) | कलम ५९(२) (घ) विख्यात संशोधक | कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेले- <br>(क) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विख्यात संशोधक असावा, <br>(ख) पुढीलपैकी प्रत्येकी केवळ एक व उपयोजित विज्ञान व तंत्रज्ञान, <br>-मानव्यविज्ञान <br>-वाणिज्य, लेखा व वित्तशास्त्र आणि <br>-आंतरविद्याशाखीय अभ्यास , <br>(ग) पीएच.डी. पदवी धारक असावा, <br>(घ) मान्यताप्राप्त, पीएच.डी. मार्गदर्शक असावा, ज्याच्या मार्गदर्शनाखाली किमान पाच विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल, <br>ङ) किमान दोन पाठयपुस्तकांचा / संदर्भ पुस्तकांचा लेखक / सहलेखक असावा किंवा मूळ लेखक / अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये किमान दहा शोधनिबंध प्रसिद्ध केलेले असावेत, <br>(च) एकूण किमान पंधरा वर्षांचा अध्यापनाचा / संशोधनाचा अनुभव असावा. |

| | | |
|---|---|---|
| (दोन) | कलम ५९(२) (च) विद्यापीठ अध्यापक | कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेले-<br>(क) विद्यापीठ विभागातील असावा,<br>(ख) पीएच.डी पदवी धारक असावा,<br>(ग) मान्यताप्राप्त, पीएच.डी. मार्गदर्शक असावा, ज्याच्या मार्गदर्शनाखाली किमान पाच विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल,<br>(घ) जो किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक / सहलेखक असावा किंवा मूळ लेखक / अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये किमान दहा शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत,<br>(ङ) एकूण किमान पंधरा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा. |
| (तीन) | कलम ५९ (२) (च) महाविद्यालयातील अध्यापक | कुलगुरुने नामनिर्देशित केलेले-<br>(क) संशोधन संस्कृतीचा आधार असलेल्या संलग्नित किंवा स्वायत्त महाविद्यालयातील अध्यापक असावा,<br>(ख) पीएच.डी पदवी धारक असावा,<br>(ग) मान्यताप्राप्त पीएच.डी मार्गदर्शक असावा, ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल,<br>(घ) किमान दोन पाठयपुस्तकांचा / संदर्भपुस्तकांचा लेखक / सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/ अनुरुप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये किमान पाच शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत,<br>(ङ) एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा. |
| (चार) | कलम ५९(२) (छ) विख्यात व्यक्ती | कुलपतींनी नामनिर्देशित केलेले-<br>जागतिक प्रवाह तसेच प्रादेशिक प्रश्नांशी सुपरिचित असलेल्या विज्ञान, वाणिज्य, कृषि, बँक व्यवसाय, वित्त, उद्योग, बौद्धिक संपदा अधिकार, इ विविध क्षेत्रातील असावा. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सिध्दार्थ खरात,**
शासनाचे सहसचिव.